दिनांक ११ जून २००९ कृपया प्रसिद्धीसाठी

# वांद्रे वरळी सागरी सेतूच्या खर्चात वाढ
## पुढील टप्प्याच्या निविदा अद्यापही नाहीत
## सुभाष देसाई यांना लेखी उत्तर

वांद्रे - वरळी सागरी सेतूची २००० साली मंजूर करण्यात आलेली अंदाजित किंमत ६६६ कोटींवरून १६३४ कोटींवर गेली आहे. त्याचबरोबर वरळी ते हाजीअली व हाजीअली ते नरीमन पॉईन्ट या टप्प्यासाठी अद्यापही निविदा मागवण्यात आल्या नाहीत, त्यामुळे प्रत्यक्षात वाहतूक कधी सुरू होईल, याबाबत साशंकता व्यक्त होत आहे. शिवसेना नेते व आमदार सुभाष देसाई यांना यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम मंत्री डॉ. विमल मुंदडा यांनी लेखी माहिती दिली आहे.

आमदार सुभाष देसाई यांनी विचारलेल्या पत्राला उत्तर देताना डॉ. मुंदडा यांनी म्हटले आहे की, वांद्रे-वरळी सागरी सेतूच्या खर्चात झालेली वाढही बांधकाम कालावधीतील भाववाढ, कर्जाऊ घेतलेल्या रकमेवरील व्याज आदींमुळे वाढली आहे. या सागरी सेतूला झालेला विलंब या त्याच्या बांधकाम प्रक्रियेतील बदलांमुळे झालेला आहे. पण वरळीपर्यंत वाहतूक सुरू झाल्यानंतर मात्र पुढे ती हाजीअली व नंतर नरीमन पॉईंटपर्यंत नेण्यासाठी अद्यापही तांत्रिक बाबींचा अभ्यास सुरू असल्यामुळे त्याच्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे यासंदर्भात आपण शासनाचा पाठपुरावा करणार असल्याचे सुभाष देसाई यांनी म्हटले आहे.